जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ६५० दिनांक - २१/०९/२०२१**

विमानतळ पोलीस स्टेशन,पुणे शहर

**“ महिलांचे मोबाईल फोन हिसकवणारी आंतरराज्यीय टोळी पकडुन देण्यास मदत करणा-या स्थानिक फळ विक्रेत्याचा पोलीस उप आयुक्त यांचे कडुन सत्कार”**

विमानतळ पोलीस ठाणेचे हददीत मागील दोन आठवडयापुर्वी मोबाईल स्नॅचिंगच्या गुन्हयांमध्ये वाढ झाल्याने अशा प्रकारच्या गुन्हयांना आळा घालण्याकरीता प्रतिबंधक उपाययोजना म्हणुन मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, विमानतळ पोलीस ठाणे पुणे यांनी विमानतळ तपास पथक व सर्व्हेलन्स पथकाची पेट्रोलिंग वाढविण्यात आली होती. त्या अनुशंगाने विमानतळ पोलीस ठाणेचे तपास पथक पोलीस ठाणे हददीत पेट्रोलिंग करीत असताना तपास पथकाचे प्रभारी सचिन जाधव यांनी विमानतळ पोलीस ठाणे हददीतील विमाननगर भागातील फळविक्रेता दत्ता भारत खाडे रा. विमाननगर पुणे यांस मोबाईल स्नॅचिंग च्या घडलेल्या गुन्हयाचे अनुशंगाने प्राप्त सी सी टी व्ही फुटेज दाखविण्यात आले होते. तसेच दत्ता खाडे हे तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचे बरोबर दोन ते तीन दिवस संशयित वाहने चेक करण्यास मदत करीत होते.

दिनांक ०९/०९/२०२१ रोजी दत्ता खाडे फळ विक्रीच्या स्टॉल वर काम करीत असताना त्यांना नंबर प्लेट नसलेल्या दोन स्प्लेंडर दुचाकी वर चार इसम दत्तमंदीर चौका मध्ये दिसल्याने त्यांनी लागलीच विमानतळ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी श्री. सचिन जाधव यांना दिली असता त्यांनी लागलीच तपास पथकातील स्टाफसह जावुन सदर इसमास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले चार इसम हे कर्नाटक राज्यातुन पुणे शहरात येवुन चोरी करीत असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहेत. आरोपी यांचे कडुन २,६५,०००/- रुपये किंमतीचे एकुण १४ मोबाईल फोन, व दोन स्प्लेंडर मोटार सायकल जप्त करण्यात आल्या असुन पुणे शहरातील वेगवेगळ्या पोलीस स्टेशन मधीलएकुण ०८ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

फळविक्रेता श्री.दत्ता भारत खाडे रा. विमाननगर पुणे यांनी पोलींसाना दिलेल्या अचुक माहिती बाबत मा.श्री. पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त परि.- ०४ पुणे शहर यांनी सत्कार करुन रोख स्वरुपात बक्षिस देवुन त्यांचा गौरव केलेला आहे. तसेच श्री. भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विमानतळ पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी दत्ता खाडे यांचे अभिनंदन केलेले आहे. श्री. पंकज देशमुख यांनी सदरवेळी अशा प्रकारे नागरीकांना पोलीस तपासामध्ये मदत करण्याचे अवाहन केलेले आहे.


महाराष्ट्र पोलीस